# साय-फाय करंडकमध्ये 'आय ॲग्री' प्रथम

**पुणे, ता. १९ :** क्विक हिल फाउंडेशनतर्फे महाराष्ट्र सायबर आणि थिएटर ॲकॅडमी यांच्या सहकार्याने आयोजित केलेल्या 'साय-फाय करंडक २०१८' मध्ये 'आमचे आम्ही' संघाने सादर केलेल्या 'आय ॲग्री' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकाविला.

या स्पर्धेमध्ये 'नाट्यसंस्कार'ने सादर केलेल्या 'एफ ५७' या एकांकिकेला द्वितीय क्रमांक आणि मुंबईतील स्वप्नपूर्ती क्रिएशनने सादर केलेल्या 'कम्युनिकेशन एरर' या एकांकिकेला तृतीय क्रमांक मिळाला.

यावेळी अभिनेते रितेश देशमुख, जॅकी श्रॉफ, विजय केंकरे, आनंद इंगळे, कैलाश काटकर आदी उपस्थित होते.